ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २१ ❑ अंक २२४ वा ❑ भारतीय सौर दिनांक १० कार्तिक शके १९४८, रविवार दि.०१ नोव्हेंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

गगनचुंबी इमारती, वाढते एकाकीपण आणि हरवलेला संवाद

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

आजच्या आधुनिक आणि अत्यंत गतिमान जीवनशैलीत माणसाने भौतिक प्रगतीचे अनेक टप्पे पार केले आहेत. टोलेजंग इमारती, आलिशान वाहने, गलेलठ्ठ पगार आणि वरवर पाहता अत्यंत सुखवस्तू वाटणारी जीवनशैली हे आजच्या प्रगतीचे मोजमाप बनले आहे. पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड हे शहर माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे मोठे केंद्र म्हणून ओळखले जाते. या शहरात देशभरातून तरुण वर्ग आपली स्वप्ने साकार करण्यासाठी येतो आणि स्थायिक होतो. मात्र, या चंदेरी दुनियेच्या आणि चकचकीत भिंतींच्या आड एक प्रचंड मोठा अंधार दडलेला आहे, याची भयंकर जाणीव नुकत्याच घडलेल्या एका अकल्पित आणि मन सुन्न करणाऱ्या घटनेने करून दिली आहे. पैशाने सर्व काही विकत घेता येते, या भ्रमात जगणाऱ्या आधुनिक समाजाला या घटनेने आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या अत्यंत वर्दळीच्या आणि उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या वाकड परिसरातील थेरगाव भागात असलेल्या एका प्रतिष्ठित व आलिशान गृहसंकुलात हा हृदयद्रावक प्रकार घडला. एकता मनोज भांगड या ३३ वर्षीय उच्चशिक्षित विवाहितेने आपल्या ६ वर्षांच्या निरागस आणि निष्पाप मुलासह या गगनचुंबी इमारतीच्या १८ व्या मजल्यावरून उडी मारून आपली जीवनयात्रा संपवली. उंच इमारतीवरून अचानक मायलेक खाली पडल्याने सोसायटीच्या आवारात एकच गोंधळ उडाला आणि उपस्थित सुरक्षारक्षक व इतर रहिवाशांच्या पायाखालची जमीनच सरकली. ही अत्यंत धक्कादायक घटना ३० ऑक्टोबर २०२६ रोजी शुक्रवारच्या संध्याकाळी साधारण साडेसहा वाजेच्या सुमारास घडली. या अनपेक्षित प्रसंगामुळे संपूर्ण शहरात सध्या शोककळा पसरली असून, स्थानिक नागरिकांमध्ये मोठी खळबळ आणि हळहळ व्यक्त केली जात आहे. मुळचे राजस्थानचे रहिवासी असलेले हे भांगड कुटुंब कामानिमित्त पिंपरी चिंचवड येथे स्थायिक झाले होते. मयत एकता यांचे पती मनोज भांगड हे एका नामांकित माहिती तंत्रज्ञान कंपनीत अतिशय चांगल्या आणि उच्च पदावर कार्यरत आहेत. या प्रशस्त घरात केवळ नवरा, बायको आणि त्यांचा लहानगा मुलगा असे ३ च सदस्य एकत्र राहत होते. मागील काही वर्षांपासून हे संपूर्ण कुटुंब या सोसायटीत अतिशय गुण्यागोविंदाने वास्तव्यास असल्याचे वरवर दिसत होते. बाहेरून अत्यंत परिपूर्ण आणि सर्वार्थाने सुखी वाटणाऱ्या या कुटुंबाचा असा करुण अंत का झाला, हा प्रश्न सर्वांनाच सतावत आहे. पोलिसांना घटनास्थळी एक चिठ्ठी सापडली असून, त्यात आजारपणाला कंटाळून हे पाऊल उचलत असल्याचा उल्लेख असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. नवरा मोठ्या पदावर, राहायला गगनचुंबी इमारतीत प्रशस्त घर असे असतानाही बंद दारांमागे कोणता ताणतणाव आणि घुसमट सुरू होती, याचा थांगपत्ता शेजाऱ्यांना किंवा कदाचित जवळच्या नातेवाईकांनाही नव्हता. या गंभीर घटनेची माहिती मिळताच वाकड पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ पंचनामा पूर्ण केला आणि दोन्ही मृतदेह आपल्या ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी तसेच सविस्तर शवविच्छेदनासाठी हे दोन्ही मृतदेह नजीकच्या सरकारी रुग्णालयात पाठवून देण्यात आले. या संपूर्ण प्रकरणाचा पोलिसांकडून अत्यंत बारकाईने आणि सर्व बाजूंनी सखोल तपास सुरू करण्यात आला आहे. सत्य परिस्थिती समोर आणण्यासाठी पोलीस आता नातेवाईक, शेजारी आणि पती मनोज यांच्याकडे कसून चौकशी करत आहेत. या घटनेच्या निमित्ताने उच्चभ्रू वसाहतींमधील मानसिक आरोग्याचा आणि हरवलेल्या संवादाचा प्रश्न अधिक गंभीरपणे समाजासमोर उभा राहिला आहे. आजकाल अशा सुखवस्तू सोसायट्यांमध्ये राहणे हे एक प्रतिष्ठेचे लक्षण बनले आहे. मात्र, या प्रतिष्ठेच्या बुरख्याआड अनेकदा भीषण एकटेपणा दडलेला असतो. आपल्या घरात काही समस्या आहेत, आपण आजारी आहोत किंवा आपण मानसिक तणावात आहोत, हे जर इतरांना समजले तर लोक काय म्हणतील, या एकाच भीतीने अनेक जण आतल्या आत कुढत राहतात. सततची स्पर्धा, कामाचा प्रचंड ताण आणि विभक्त कुटुंबपद्धती यामुळे नैराश्य आल्यास मन मोकळे करण्यासाठी घरातच हक्काचे व्यासपीठ उरलेले नाही. आधुनिक जीवनशैलीने माणसाला सर्व भौतिक सुखे दिली असली तरी घरातील माणसांचा परस्परांसोबत घालवण्याचा मोलाचा वेळ हिरावून घेतला आहे. प्रत्येक जण आपापल्या भ्रमणध्वनीच्या आभासी जगात गुंग आहे. जेव्हा माणसाला आपले दुःख ऐकण्यासाठी समोर कुणीच दिसत नाही, तेव्हाच तो मृत्यूला जवळ करण्याचा विचार करतो. या दुर्दैवी घटनेतून समाजाने आणि विशेषतः आधुनिक जीवनशैली जगणाऱ्या तरुण पिढीने योग्य तो बोध घेणे अत्यंत आवश्यक आहे. शारीरिक आजारांप्रमाणेच मानसिक आजारांवरही उघडपणे आणि विनासंकोच बोलले गेले पाहिजे. कुटुंबातील सदस्यांनी एकमेकांना केवळ गृहीत न धरता, त्यांच्या वागण्यातील बदल ओळखून त्यांना भक्कम भावनिक आधार दिला पाहिजे. संवादाची तुटलेली नाळ पुन्हा जोडणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे. नुसते सल्ले न देता घरातील व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून घेण्याची सवय समाजाने लावून घेतली पाहिजे. गरज पडल्यास मानसोपचारतज्ज्ञ किंवा समुपदेशकाची वैद्यकीय मदत घेणे यात कोणताही कमीपणा नाही, हे समाजात रुजवणे नितांत गरजेचे आहे. सिमेंटच्या जंगलात घरे जितकी उंच होत आहेत, माणसांची मने तितकीच छोटी आणि आत्मकेंद्रित होत चालली आहेत. हा एकाकीपणाचा प्रवास असाच सुरू राहिला, तर अशा दुर्दैवी घटनांची मालिका थांबवणे अशक्य होईल. त्यामुळे भौतिक सुखांच्या आणि प्रतिष्ठेच्या मागे धावता धावता क्षणभर थांबून, आपल्या माणसांना वेळ देणे आणि त्यांच्या खंबीरपणे पाठीशी उभे राहणे हाच या धकाधकीच्या जीवनावरील सर्वात प्रभावी आणि शाश्वत उपाय आहे.



लहान वयातच मुलांमधील अंगभूत कला ओळखून तिला वाव दिल्यास देशाचे आदर्श नागरिक घडतात - शिरीष चिटणीस

लोकमंगल प्राथमिक विद्यामंदिर, कोडोली येथील दीपोत्सव २०२६ सोहळ्यात अंगणवाडी सेविकांचा प्रमुख अतिथी म्हणून अनोखा सन्मान

ज्योतिर्मय साहित्य

सातारा – लहान वयातच मुलांमधील अंगभूत कला ओळखून तिला वाव दिल्यास मुलांचे भविष्य समृद्ध होते आणि देशाचे आदर्श नागरिक घडायला सुरुवात होते, असे प्रतिपादन लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिरीष चिटणीस यांनी केले. ते लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेच्या लोकमंगल प्राथमिक विद्यामंदिर एम. आय.डी.सी., कोडोली, सातारा येथे आयोजित दीपोत्सव २०२६ कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिरीष चिटणीस होते. प्रमुख अतिथी म्हणून अंगणवाडी सेविका नीता प्रवीणकुमार सूर्यवंशी, शांता अशोक कदम, मंदा चव्हाण, शुभांगी खामकर, नलिनी निर्मळ व शबनूर गुलाब मुलानी उपस्थित होत्या. लोकमंगल हायस्कूलचे मुख्याध्यापक विजय यादव, प्राथमिकचे मुख्याध्यापक कल्याण भोसले, सतीश पवार, आदी उपस्थित होते.

शिरीष चिटणीस यांनी आपल्या भाषणात पुस्तके मानवी जीवन कसे घडवतात आणि वाचनाची प्रक्रिया किती महत्त्वाची आहे, हे अधोरेखित केले. जगभरात ६३ भाषांमध्ये भाषांतरित झालेल्या व कोट्यवधी प्रती खपलेल्या द बुक थीफ या पुस्तकाची कथा सांगून, हुकूमशाही किंवा कठीण काळातही पुस्तकांनी मानवी मूल्ये कशी जिवंत ठेवली, याचे प्रभावी उदाहरण त्यांनी दिले.

विद्यार्थ्यांनी शाळा-कॉलेजमध्ये शिकताना विविध सण, उत्सव किंवा जयंतीनिमित्त न घाबरता लिखाण करावे; यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होऊन भविष्यात अभ्यासात व मुलाखतींमध्ये यश मिळते, असे आवाहन त्यांनी केले. पालकांनी आपल्या पाल्यांना टीव्ही व मोबाईलपेक्षा पुस्तकांच्या व वाचनाच्या विश्वाकडे वळवावे तसेच शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना लिखाणासाठी सतत प्रोत्साहन देऊन नवीन लेखक घडवण्यास मदत करावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

शाळांमध्ये पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना शांत आणि सुंदर दिवाळी साजरी करण्याचा संदेश देण्यात आला. फटाक्यांऐवजी रांगोळी, कंदील आणि सुगंधी दिव्यांनी सजावट करण्याचे आवाहन करण्यात आले. ध्वनी प्रदूषणाचे दुष्परिणाम समजावून सांगताना फटाक्यांच्या मोठ्या आवाजाने लहान बाळं, वृद्ध आणि पक्षी-प्राणी



घाबरतात, हे मुलांना गोष्टींच्या माध्यमातून पटवून देण्यात आले. फटाक्यांवरील खर्च टाळून वाचवलेले पैसे पुस्तके, कला साहित्य किंवा गरजूंना मदतीसाठी वापरण्याचे आवाहन करण्यात आले. आवाज कमी, आनंद जास्त हा मुख्य संदेश घेऊन शाळांमध्ये आकाशकंदील उपक्रम राबवले जात असून हा उपक्रम निश्चितपणे स्तुत्य असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

शबनूर मुलानी यांनी आपल्या भाषणात ३ ते ६ वयोगटातील मुलांवर संस्कार करणे हे कुंभाराने मातीच्या गोळ्याला वळण देऊन मडके किंवा रांजण घडवण्यासारखे असते, असे सांगितले. मुलांमधील सुप्त कलागुणांना व कलाकृतींना प्रोत्साहन दिल्यास त्यांची सर्जनशीलता बाहेर येते. अंगणवाडीत मुलांना पेन्सिल पकडण्यापासून रेषा ओढणे, गोल काढणे, तसेच वाचन व लेखनाची पायाभूत तयारी करून घेतली जाते; ज्यामुळे मुले इयत्ता पहिलीत जाण्यापूर्वीच लिहायला व वाचायला सक्षम होतात. बालक ६ वर्षांचे झाल्यावर पालकांना जवळच्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी मार्गदर्शन केले जाते, असेही त्यांनी सांगितले.

अंगणवाडीत शिक्षणासोबतच मुलांच्या पौष्टिक आहारावर विशेष लक्ष दिले जाते. आहारातून मुलांची शारीरिक व वजनाची वाढ योग्य झाल्यास मेंदूचा विकास चांगला होतो, जो आजच्या संगणक युगात अत्यंत आवश्यक आहे, असे मत व्यक्त करण्यात आले. दुकानातील फास्ट फूड (जसे की कुरकुरे, मॅगी, चिप्स) खाल्ल्याने पचनक्रिया बिघडते, आतड्यांना संसर्ग होतो व पोटाचे गंभीर आजार (उदा. कॅन्सर) होण्याचा धोका असतो. फास्ट फूडऐवजी मुलांनी राजगिऱ्याचे लाडू, शेंगदाण्याची चिक्की, खजूर, फुटाणे आणि घरची भाजी-भाकरी किंवा चपाती असा पौष्टिक आहार घेतला पाहिजे, असे आवाहन करण्यात आले. उपस्थित मुलांकडून फास्ट फूड न खाण्याचा आणि आरोग्याची काळजी घेण्याचा संकल्प (प्रॉमिस) घेण्यात आला.

नीता सूर्यवंशी यांनी आपल्या भाषणात गेल्या २० ते २५ वर्षांच्या सेवेच्या काळात पहिल्यांदाच अंगणवाडी सेविकांना कार्यक्रमात अतिथी/अध्यक्ष म्हणून आमंत्रित करून सन्मानित करण्यात आले; याबद्दल संस्था, व्यवस्थापन समिती व शिक्षकांचे आभार मानले. अंगणवाडी आणि शाळा यांनी एकमेकांना सहकार्य करून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

शांता कदम यांनी दीपोत्सव उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेल्या पणत्या, फटाक्यांच्या प्रतिकृती व विविध कलाकृतींचे विशेष कौतुक केले. शुभांगी खामकर यांनी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या सुंदर आकाशकंदील, पणत्या व वस्तूंचे कौतुक करून सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या तसेच मुलांनी केलेल्या आदरातिथ्याबद्दल व स्वागताबद्दल आनंद व्यक्त केला.

विजय यादव यांनी आपल्या भाषणात लोकमंगल लोकशिक्षण संस्था, लोकमंगल हायस्कूल आणि प्रायमरी विद्यामंदिर यांच्या वतीने आयोजित दीपोत्सव सोहळ्यात अंगणवाडी सेविका व बालवाडी शिक्षिकांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आल्याचे सांगितले. संस्थेच्या अध्यक्षांच्या सूचनेनुसार कोणत्याही बाहेरील व्हीआयपी व्यक्तीऐवजी प्रत्यक्ष बालकांना घडवणाऱ्या शिक्षिकांनाच कार्यक्रमाचे मुख्य अतिथी व अध्यक्षस्थान देऊन व्यासपीठावर सन्मानित करण्यात आले, ही अनोखी संकल्पना व सामाजिक दृष्टिकोन असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेल्या सुंदर आकाशकंदिलांचे कौतुक करण्यात आले. विविध शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यात आणि बालकांना घडवण्यात अंगणवाडी सेविकांचे मोठे योगदान असते. अशा कार्यक्रमांमधील सन्मानामुळे त्यांना अधिक उत्साहाने काम करण्याची नवी ऊर्जा मिळते, असे त्यांनी सांगितले. सर्व बालगोपाळांना दिवाळीच्या शुभेच्छा देतानाच पर्यावरणपूरक व प्रदूषणविरहित दिवाळी उत्साहाने साजरी करण्याचे आवाहन त्यांनी केले. संदीप जाधव यांनी आपल्या भाषणात बालकुमार साहित्य संमेलनाच्या माध्यमातून अमरेंद्र भास्कर व इतर मान्यवर प्रत्येक लहान-मोठ्या कार्यक्रमाला हजेरी लावून विद्यार्थ्यांना नेहमी मार्गदर्शन व प्रेरणा देतात, याकडे लक्ष वेधले. बालकुमार साहित्य संमेलन भरवण्यामध्ये शिरीष चिटणीस यांचा खूप मोठा वाटा असतो, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात आणि वर्गांमधील सर्व बालकांना दिवाळीनिमित्त मिष्टान्न वाटप करण्यात आले. यावेळी नलिनी निर्मळ यांनी विविध शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यात आणि बालकांना घडवण्यात अंगणवाडी सेविकांचे मोठे योगदान असते. अशा कार्यक्रमांमधून मिळालेल्या सन्मानामुळे त्यांना अधिक उत्साहाने काम करण्याची नवी ऊर्जा मिळते, असे प्रतिपादन केले. यावेळी मंदा चव्हाण यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास संदीप जाधव, हणमंत खुडे, उर्मिला सातपुते, सुजाता शिंदे, चंद्रकांत देवगड, दत्तात्रय शिर्के, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकाशकंदीलांचे तसेच दीपावली शुभेच्छा पत्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशील कलाकृतींचे सर्वांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कल्याण भोसले यांनी केले. सूत्रसंचालन संदीप जाधव यांनी केले तर आभार हणमंत खुडे यांनी मानले.

चांदणे शिंपित जाई....

ज्योतिर्मय साहित्य

टक टक करत त्या चार पाच पायऱ्या उतरले, हळूवार एक नजर मागे वळली. मनात कितीतरी सोनेरी क्षण साठवून गाडीच्या चाकांनी वेग घेतला. दगदगीने आधीच डोक्याचा ताबा घेतला होता. डोळ्याच्या किलकिल्या झालेल्या पापण्या आणि.... अन् एका अनामिक ओढीने नातेवाईकांकडे जाऊन आवरा आवर करुन घरी निघण्याची तयारी झाली.

दिवसभर दूडू दूडू धावणारी पाऊले आणि स्वप्नांच्या हिमवर्षावात गाली खळी खुलत मिटलेले ते डोळे जणू... आईच्या हाताच्या उशीत अलगद.. विसावलीत असे वाटत होते. काही क्षणांच्या विश्रांती नंतर..


नि मग....कायम किट किट

करणारा तो क्षण विसावून पहिल्या पायरी वरून दुसऱ्या पायरीवर आला.

''चला निघायचं य ना !''

अनामिक ओढीने, व्याकुळ मन पाझरू लागले... दूर देश मनात हुरहुर होऊन समोर येऊ लागला. नि मग हाताचे ते पालव.. आणि सर्रकन उडालेली धूळ वेगवेगळ्या वाटा वाटानी पांगली.

आणि चाके धावू लागली. त्या कोलाहलात गोंगाटात .. जमिनी सोबत हळू हळू मागे मागे सरकत त्या काळ्या डांबरा वरून मागे सरकणारी जमीन,



त्यासोबत च दिवसभराच्या कोलाहलतून शांत व्हायला लागलेली झाडे अगदीच स्थिर अन् शांत व्हायला लागली होती. धावणाऱ्या चाकासोबत मंद वारा आला नि दूरवरुन दरवळणारा तो मृदा गंध मनाला सुखावून गेला. आणि लक्ष वेधून घेतले, ते उगवतीला दूरवर विसावलेल्या त्या सावल्यानी साहजिकच नजर वळली ती त्या मावळतीला झुकलेल्या त्या सहस्त्रशमी कडे ढगांच्या एकावर एक असलेल्या कलाकृती जणू सागराच्या लाटा अन.. ओठांवर आले कितीदा नव्याने अगदी रोज नव्याने येत असशील ना, ढगांच्या त्या लाटांमध्ये कधी वर तर कधी खाली बुडत होता. जीवनाचा आणि जीवन चक्राचा किती सुंदर संगम हो ना!

मनाच्या खलबळीच्या कोपऱ्यात एक सल सलत आकाशीचा तो रविराज सांगू पाहत होता का काही..!!

धावतेय, पळतेय माणूस, वेळ, निसर्ग सार सार काही. सार किती धावतय, पळतयं. तोंडून शब्द बाहेर पडले जग किती धावतय ना! धावणाऱ्या त्या जगात कुठेतरी स्टॉप वर थांबल्यानंतर कितीतरी डोळ्यातली ती ओढ

अन् काळजी डोळ्यातून ओसंडून वाहताना दिसत होती. मागे मागे जाणारा रस्ता आणि सोबत ची ती सावली मनाला पुन्हा पुन्हा त्याच ठिकाणी नेऊन ठेवत होती. ती लगभग, प्रास्ताविक आरंभ, अगदी सु मधुर स्वागत गीत ओसंडून वाहणारा प्रत्येक चेहऱ्यावरचा तो आनंद, मान्यवरांचे आगमन स्वागत समारंभ आणि कवी कवियत्री यांच्या सोबत अगदी बहारदार सुरुवात झाली.



सरांच्या मार्गदर्शना नंतर वाटले. खरच आपण आपल्या अंतर मनात डोकावायला हवे.अंतर्मुख होऊन आपण काय लिहतो हे पाहायला हवे. साहित्यिक समाज मनाचा आरसा असतो. आपण या समाजाचे काहीतरी देणे लागतो. या समाजासाठी काहीतरी चांगले करण्याचा मनोमन एक संकल्प केला. सरांचे शब्द ऐकताना भारावून गेले. नि वाटले खरचं लेखन माणसाला कुठेपर्यंत घेऊन जाऊ शकते याची प्रचिती कथेतून आली. तसेच मॅडमच्या प्रास्ताविक कथा याच्यामुळे लेखनाचे महत्व चांगलेच लक्षात आले.

तसेच तिथे असणाऱ्या प्रत्येक व्यक्तिमत्त्वाकडून मला खूप काही शिकायला मिळाले. आनंद शिस्त शांतता आणि कार्यक्रम खूप छान पार पडला.

आपण सर्वजण मिळून या समाजासाठी खूप काही करू शकतो ची नवी प्रेरणा मिळाली. मन सकारात्मकतेच्या वाटेवर धावू लागले. एकूण सर्व कार्यक्रम वैचारिक मंथन करून गेला. विचाराच्या धुंदीत हाताकडे पहात आज या इवल्याशा ओंजळीत ओसंडून घरंगळणारी शब्दफुले अन् मनाच्या कुपीत अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वाच्या मार्गदर्शनाची शिदोरी काव्य वाचन मनन चा आनंद, नविन ओळखी कवी कवियित्री सहकारी आणि खूप काही घेऊन जणू देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे असेच काहीसे झाले.

कार्यक्रमात हजर असणाऱ्या प्रत्येक व्यक्ती कडून मला लेखनासाठी प्रेरणा मिळाली.

वेळेच्या त्या कालचक्रात अन् विचाराच्या तंद्रीत मावळतीचा रविराज निशेत केंव्हा विसावला ते सुद्धा कळले नाही.

अन् एका क्षणाला समोर दिसू लागलेला खंबाटकी चा तो बोगदा आणि बोगद्यातून बाहेर पडता पडता दुचाकीच्या हॉर्न ने तंद्री मोडली. अन् मागे वळून पाहताना ती अनामिक नजर ..

त्या तिथे पलिकडे करत
ढगाआडचे ते चांदणे...

आणि त्याचे ते तेजोवलय...! जणू काळे ढग बाजूला होऊन दिसणारा तो चंद्र खूप काही सांगत होता का! निसटलेल्या क्षणांची आणि मनात कायमसाठी कोरलेल्या क्षणांची साक्ष देत हळूहळू घराच्या अंगणापर्यंत आली.

अन् ओठी आले...
तेव्हाच्या क्षणांची ती ''अपूर्वाई''
आनंदी क्षणांची साक्ष देई,
स्मृति गंधातील क्षणांच्या आनंदाचे चांदणे शिंपित अंगणी उतरुनी येई.

क्रमशः




जात्यावरच्या ओव्या.....

नाही पडलास पाण्या
सारे वाळले इरादे
शेतकऱ्यांच्या नशिबी
नही कष्टाचे फायदे ||९१७||

नाही पडलास पाण्या
केलीस खरी मात
पाणी पिवून झोपली
लेकर झोपडीत ||९१८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ८४



ज्योतिर्मय साहित्य

भगवान शंकरांसारखा योगिराणा देखील नित्यनेमाने श्रीरामांचे नामस्मरण करतो. आपल्या नामस्मरणाचा जो नेम आहे, त्यात खंड पडू देत नाही. तपस्वी आणि मस्तकावर चंद्र धारण करणाऱ्या भगवान शंकरांचा दाह रामनामानेच शांत झाला. रामनाम हेच त्यांचे विश्रांतीचे ठिकाण आहे. तिथेच ते रमतात. आपणही या रामनामाचे नित्यनेमाने स्मरण करावे. रामनामाची जीवाला सवय असली तरच अंतकाळी आपल्या मुखात रामनाम येईल. रामनामामुळे आपली ऊर्जा ऊर्ध्वगामी होते. विकारांमुळे आपली ऊर्जा अधोगामी होते. आयुष्यात जाणीवपूर्वक जर नियमितपणे रामनाम घेतले तर अंतकाळी देखील मुखातून तेच बाहेर पडेल. गोंदवलेकर महाराज म्हणतात,'' रामनाम ही अंतकाळी आपल्या मुखातून बाहेर पडणारी शेवटची गोष्ट असली पाहिजे.'' असे नाम आपल्या मुखात अंतकाळी आले तर श्रीराम आपली या जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका करील.




स्वसंवाद : १. ज्याप्रमाणे श्रेष्ठ योगेश्वरांचे रामनाम हे विश्रांतीस्थान आहे, तसे माझे मन संसाराच्या धावपळीतून थकल्यावर रामनामात विसावा शोधते का?

२. वेगवेगळ्या देवांमध्ये किंवा पंथांमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद करून मी माझे चित्त कलुषित करतो आहे, की सर्वांभूति एकच तत्त्व पाहण्याचा प्रयत्न करतो?

३. माझ्या दैनंदिन जीवनातील विकारांमुळे माझी ऊर्जा अधोगामी (खाली) जात आहे की नामस्मरणामुळे ती ऊर्ध्वगामी (सकारात्मकतेकडे) प्रवास करत आहे?

४. गोंदवलेकर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे, ''रामनाम ही अंतकाळी मुखातून निघणारी शेवटची गोष्ट असावी'' यासाठी मी आजपासूनच नामस्मरणाचा नित्यनेम आणि त्याची गोडी मनाला लावली आहे का? **(क्रमशः)**







श्री ब्रह्मचैतन्य
गोंदवलेकर महाराज

नामाचा अनुभव

ज्योतिर्मय साहित्य

नामाचा अनुभव कोणता ? नामाचा अनुभव नामाव्यतिरिक्त दुसऱ्या कशात पाहू नये; म्हणजे, नामापासून दुसरे काही मिळवायचे आहे ही कल्पनाच नसावी. नाम मुखी येते हाच नामाचा अनुभव. ज्या प्रमाणात आपल्या हातून नामस्मरण घडले त्या प्रमाणात आपल्याला नामाचा अनुभव आला असे समजावे. अखंड नामस्मरण टिकले, की पुरा अनुभव आला. नामस्मरण करता करता चित्त एकाग्र होते. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. मी कोण आहे हे कसे ओळखावे ? ' मी कोण आहे ' हे ओळखायला, जडाने म्हणजे वाचेनेच नाम घेण्यास सुरुवात करावी, आणि ते नाम अखंड घेण्याचा प्रयत्न करावा. मग ते मनाने आतल्याआत होऊ लागते. पहिल्यानेच आपल्या प्रयत्नाने मनाला नामाचे वळण लावण्याच्या नादी लागू नये, कारण ते फारच अवघड आहे. नाम घेता घेता देहाचा विसर पडल्यावर मी कोण आणि देव कोण हे आपोआप कळेल.

भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दुःखाची जाणीव कमी होते. दुःखाची जाणीव नसल्यावर दुःख असले म्हणून बिघडले कुठे ? काळोख्या रात्री जशी काठी आधार असते, तसे संसारात नाम आहे. खाचखळगे काठीच्या योगाने टाळता येतात, तसे मोह, लोभ इत्यादि संसारातल्या अडचणी नामाने समजतात आणि दूर करता येतात. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते, तसे नामाची शेगडी ठेवली की अभिमान वितळलाच पाहिजे. हाच नामाचा अनुभव. पण लोक नामाबद्दल ऐकूनच घेत नाहीत; जर कोणी ऐकून घेतले तर ते बिंबवून घेत नाहीत, त्याचे मनन करीत नाहीत; आणि मनन करून ज्यांना ते पटले, ते पटले असूनही नाम घेत नाहीत. अडचणी असल्या तरी नाम घेता येते. म्हणून नामस्मरण न करण्याबद्दल सबबी सांगू नका. सबब सांगितली की त्यापासून लबाडी उत्पन्न होते, लबाडीतून आळस उत्पन्न होतो, आणि आळसाने सर्वनाश होतो. आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्यांच्यावाचून अडून बसू नये. भगवंताचे स्मरण हे मुख्य आहे. अखंड नामस्मरण ठेवायला सोवळ्याओवळ्याचे बंधन नाही. अखंड स्मरणच सोवळे आहे.

उपासना कोणतीही असली तरी नामाशिवाय ती पचनी पडत नाही. महत्त्व नामाला आहे. निरनिराळ्या देशांतले अन्न निरनिराळे असू शकते, पण ते पचविण्याकरिता लागणारे पाणी इथून तिथून सर्व सारखेच. पाण्याशिवाय कोणतेही अन्न पचणार नाही. त्याप्रमाणे उपासनारूपी अन्नाला पचविण्यासाठी नामरूपी पाण्याची जरुरी आहे. म्हणून नामाला महत्त्व देऊन ते सतत घेण्याचा अभ्यास करावा. कसाही प्रसंग आला तरी नामस्मरण सोडू नका. त्यातून परमात्मा हात देईल.

नाम घ्यायला स्वतःचीच आडकाठी असते. ती दूर केली तर नामाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.

***







घराघरातील वाढता तणाव : वयात येणारी मुलं आणि चिडचिडी आई!

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

५. दररोज थोडा वेळ एकमेकांसाठी ठेवा. दिवसभरात किमान १०१५ मिनिटे मोबाईल बाजूला ठेवून एकमेकांशी मनमोकळा संवाद साधा.

६. आईने स्वतःची काळजी घ्यावी. पुरेशी झोप, संतुलित आहार, चालणे, योगाभ्यास आणि स्वतःसाठी थोडा वेळ यामुळे ताण हाताळण्यास मदत होऊ शकते.

५. आयुर्वेद आणि मानसिक आरोग्य*

- आयुर्वेदात संतुलित आहार, नियमित दिनचर्या, पुरेशी झोप आणि मनः शांती यांना महत्त्व दिले आहे.
- नियमित वेळी झोपणे आणि उठणे, पौष्टिक आहार घेणे, हलका व्यायाम करणे, श्वसनाचे व्यायाम करणे आणि शांत वातावरणात वेळ घालवणे या सवयी आई आणि मुलांसाठी उपयुक्त ठरू शकतात.
- शरीर आणि मन यांचे आरोग्य परस्परांशी संबंधित आहे. मात्र, सततची चिडचिड किंवा मनःस्थितीतील मोठे बदल हे केवळ हार्मोन्स किंवा वात-पित्त-कफ यांच्या असंतुलनामुळे होतात असे समजणे योग्य नाही. गरज पडल्यास डॉक्टर किंवा मानसिक आरोग्यतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

६. मुलांना शिस्तीइतकीच समजून घेण्याची गरज असते!

- मुलं चुकतात, हट्ट करतात, प्रश्न विचारतात आणि कधी आईच्या विरोधातही बोलतात. पण या प्रत्येक कृतीमागे वाईट हेतू असतोच असे नाही.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

- त्याचप्रमाणे आईही कधी थकते, चिडते किंवा नकळत कठोर शब्द बोलते. तिच्या प्रत्येक प्रतिक्रियेमागेही वाईट हेतू असतोच असे नाही.
- म्हणूनच घरातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या वागण्याची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.
- मुलांनी आईच्या कष्टांची जाणीव ठेवावी आणि आईने मुलांच्या बदलत्या भावविश्वाचा आदर करावा. वाद झाल्यास माफी मागणे, एकमेकांचे म्हणणे ऐकणे आणि गैरसमज दूर करणे यामुळे नात्यांमध्ये विश्वास वाढतो.


निष्कर्ष : घरातील शांतता ही सर्वांची जबाबदारी!

- घर हे केवळ चार भिंतींचे ठिकाण नसते; ते प्रेम, विश्वास, संस्कार आणि भावनिक सुरक्षिततेचे विश्व असते.
- वयात येणाऱ्या मुलांना समजून घेणारी आई आणि आईच्या भावनांचा आदर करणारी मुलं यांच्यामुळे घरातील वातावरण अधिक आनंदी होऊ शकते.
- मुलांना केवळ शिस्तीची गरज नसते, तर त्यांचे म्हणणे ऐकून घेणाऱ्या माणसाचीही गरज असते. आईला केवळ जबाबदाऱ्या पार पाडणारी व्यक्ती न समजता, भावना आणि विश्रांतीची गरज असलेली व्यक्ती म्हणूनही पाहिले पाहिजे.
- दोष देण्यापेक्षा समजून घ्या, रागावण्यापेक्षा संवाद साधा आणि दूर जाण्यापेक्षा एकमेकांच्या जवळ या.

कारण ''घरातील शांतता ही एका व्यक्तीच्या सहनशीलतेवर नाही, तर संपूर्ण कुटुंबातील प्रेम, संवाद आणि परस्पर आदरावर टिकून असते!''

टीप : हा लेख सर्वसाधारण आरोग्यविषयक माहितीसाठी आहे. सततची चिडचिड, उदासीनता किंवा दैनंदिन जीवनावर परिणाम करणारे बदल जाणवत असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा

***



माणुसकी जिवंत आहे - संवेदनशील मनाचा संघर्ष

ज्योतिर्मय साहित्य

आजचे युग हे प्रचंड गतिमान, स्पर्धात्मक आणि काहीसे आत्मकेंद्री बनले आहे. प्रत्येक माणूस स्वतःच्या प्रगतीचे वर्तुळ आखून त्यातच व्यग्र आहे. अशा या धावपळीच्या आणि आभासी जगात ''माणूस माणसाला विसरत चालला आहे का?'' असा गंभीर प्रश्न अनेकदा उपस्थित होतो. मात्र, पुणे जिल्ह्यातील खेड-राजगुरूनगर येथील लेखक, निवेदक आणि समाजसेवक कैलास बाजीराव दुधाळे यांनी या प्रश्नाला आपल्या कृतीतून अत्यंत सडेतोड आणि सकारात्मक उत्तर दिले आहे. त्यांनी स्वतः अनुभवलेल्या, जमिनीवर प्रत्यक्ष जगलेल्या आणि पाहिलेल्या विदारक सामाजिक वास्तवाला ''माणुसकी जिवंत आहे'' या त्यांच्या पुस्तकातून समाजासमोर आणले आहे.

२३ ऑगस्ट २०२६ रोजी हुतात्मा शिवराम हरी राजगुरू जयंतीचे दिवशी हे पुस्तक राजगुरुनगर वासियांना समर्पित केले आहे


ऑगस्ट २०२६ मध्ये चंद्रमा गार्डन, राजगुरूनगर येथे मोठ्या उत्साहात या पुस्तकाचा ऐतिहासिक प्रकाशन सोहळा पार पडला. हे पुस्तक केवळ कागदावर उमटलेले शब्द नसून, एका ध्येयवेड्या समाजसेवकाच्या निस्वार्थ सेवेची आणि संघर्षाची कहाणीआहे.

लेखक कैलास दुधाळे यांची सामाजिक प्रवासाची पार्श्वभूमी अत्यंत संघर्षाची आणि प्रेरणादायी आहे. मूळचे अगदी साध्या आणि गरीब परिस्थितीतील असलेले कैलास दुधाळे हे एकेकाळी स्वतःची रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असत. रिक्षा चालवतानाच त्यांच्या



संवेदनशील मनाला आजूबाजूच्या उपेक्षित समाजाचे दर्शन घडले. ''समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो'' हा दृढ निश्चय मनात बाळगून त्यांनी स्वतःला समाजसेवेच्या स्वाधीन केले. राजगुरूनगर येथे त्यांच्या मार्गदर्शनाखाली चालणारे माऊली सेवा प्रतिष्ठान ही केवळ एक स्वयंसेवी संस्था () नसून, ती अनेक असहाय्य जीवांची मायेची सावली बनली आहे.

रस्त्यावर बेवारसपणे फिरणारे मनोरुग्ण, हक्काचे छप्पर नसलेले अपंग, निराधार वृद्ध, कचराकुंडीजवळ अन्नासाठी भटकणारे जीव आणि समाजाने नाकारलेले वैफल्यग्रस्त घटक यांना शोधून आणणे, ही या प्रतिष्ठानची मुख्य ओळख आहे. अशा व्यक्तींना केवळ आश्रय देणे एवढ्यापुरतेच हे कार्य मर्यादित नाही; तर त्यांची स्वतःच्या हाताने दाढी करणे, त्यांना आंघोळ घालणे, त्यांच्या जखमांवर औषधोपचार करणे आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे यांसारखी कठीण व अंगावर काटा आणणारी कामे कैलास दुधाळे आणि त्यांचे सहकारी रात्रंदिवस तहान-भुकेची पर्वा न करता करत आहेत. ज्या मनोरुग्णांना किंवा बेवारस व्यक्तींना त्यांचे स्वतःचे नातेवाईकही जवळ करत नाहीत, त्यांना माऊली सेवा प्रतिष्ठानने पोटच्या मुलाप्रमाणे व हक्काच्या भावाप्रमाणे सांभाळले आहे. अनेकांचे मानसिक संतुलन ठीक करून त्यांना त्यांच्या मूळ कुटुंबापर्यंत पोहोचवण्याचे अत्यंत पवित्र कामही या



संस्थेने केले आहे.

प्रेरणेचाअखंड स्त्रोत, परिवर्तन मनाचे, आरंभ सेवा व्रताचा, जगाचा पोशिंदा जगलाच पाहिजे, घर माणुसकीचे, संघर्षाला वय नसते, उमलत्या वयात कष्टाचा डोंगर आधार पावलांना, हरवलेल्या बाबांची कहाणी, सन्मान संघर्षाचा, मदत अशी ही, अशा ५० प्रकरणातून त्यांनी या कहाण्या विशद केल्या आहेत. समोर मांडल्या आहेत.

माऊली सेवा प्रतिष्ठान राजगुरुनगर संस्थापक, हुतात्मा राजगुरू सोशल फाउंडेशन राजगुरुनगर, संचालक राजगुरुनगर परिसर विकास मंच, याद्वारे त्यांचे सामाजिक कार्य सुरू आहे तसेच व्यवसाय माऊली ॲडव्हर्टायझिंग, कार्यक्रमांचे निवेदन आणि रिक्षा व्यवसाय आहे.

आदर्श सामाजिक कार्यकर्ता, कोरोना योद्धा पुरस्कार, आभाळमाया राष्ट्रीय पुरस्कार, अशा अनेक पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे.

आपले हे अनुभव त्यांनी पुस्तकातील प्रकरणात दिलेले आहेत, त्यावरून आपल्याला त्यांच्या एकूण सामाजिक कार्याची कल्पना येते त्यासाठी मात्र आपल्याला माणुसकी जिवंत आहे हे पुस्तक वाचायला हवे.

व्यापारी स्वरूपाचा वृद्धाश्रम काढण्यापेक्षा उपेक्षित, बेवारस आणि समाजाने नाकारलेल्या वृद्धांना व मनोरुग्णांना हक्काचे छप्पर आणि कौटुंबिक माया देण्यावर भर द्यायला हवा आहे. आजकाल मुले सुशिक्षित आणि श्रीमंत झाल्यानंतर आपल्या वृद्ध आई-वडिलांना ओझं समजून वृद्धाश्रमात सोडून देतात, कधीतरी भेटायला येतात ही अत्यंत क्लेशदायक बाब आहे.

त्यामुळे केवळ वृद्धाश्रम नावाची संस्था चालवण्यापेक्षा, रस्त्यावर कचराकुंडीपाशी किंवा उघड्यावर आजारी अवस्थेत पडलेल्या, ज्यांना हक्काचे कोणीच नाही असे जे निराधार आहेत अशा आजोबा-आजींना आधार द्यावा.

(क्रमशः)

संत तुकाराम प्राथमिक विद्यालयात इंदिरा गांधी यांना अभिवादन; सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती उत्साहात साजरी



ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल, डॉ. आंबेडकर नगर, छत्रपती संभाजीनगर येथे आज माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन आणि देशाचे पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती देशभक्तीपूर्ण वातावरणात उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे सर मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला इंदिरा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी मुख्याध्यापक संदिप सोनवणे, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी श्रद्धा सुनील साबळे, इयत्ता आठवीची सायमा शेख, तसेच प्रज्ञा मिसाळ, स्वराज मिसाळ, पूर्वी साबळे, सलोनी मगरे व समरीन शेख यांनी इंदिरा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्याविषयी माहिती सांगितली. इंदिरा गांधी यांचे देशासाठीचे योगदान तसेच सरदार पटेल यांनी संस्थाने विलीन करून देश एकसंध करण्यासाठी केलेले कार्य विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून मांडले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मनोगतांना उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

मार्गदर्शन करताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे सर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकता, अखंडता आणि देशसेवेचे महत्त्व सांगितले. थोर नेत्यांच्या त्यागामुळे आणि कार्यामुळे आजचा भारत घडला आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवावी, असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी या नेत्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन शिक्षणात प्रगती करावी, शिस्त व प्रामाणिकपणा अंगी बाणवावा आणि देशाचे जबाबदार नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी केले.

मुख्याध्यापक संदिप सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना माहिती देताना सांगितले की, देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधी यांनी देशाच्या विकासासाठी मोठे योगदान दिले. त्यांच्या धाडसी निर्णयक्षमतेचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले, त्यामुळे हा दिवस त्यांचा स्मृतिदिन म्हणून पाळला जातो.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्याबद्दल बोलताना ते म्हणाले की, स्वातंत्र्यानंतर देशातील सुमारे पाचशेहून अधिक संस्थाने भारतात विलीन करून देशाला एकसंध करण्याचे ऐतिहासिक कार्य सरदार पटेल यांनी केले. त्यांच्या कणखर नेतृत्वामुळे त्यांना लोहपुरुष असे संबोधले जाते. त्यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थ्यांनी देशाची एकता, अखंडता आणि बंधुभाव जपण्याचा संकल्प करावा, जात, धर्म, भाषा यांपलीकडे जाऊन सर्वांशी प्रेमाने वागावे, तसेच शिक्षण घेऊन देशाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी राष्ट्रीय एकतेची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरणकुमार सोनवणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन हर्षल पगारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

गीत - संगीताच्या साक्षीने रंगली ज्येष्ठ नागरिकांची कोजागिरी

ज्योतिर्मय साहित्य

पिंपळे सौदागर - चंद्र चांदण्यांशी निगडीत शब्दाविष्कारांना प्रतिबिंबित करणाऱ्या गीतरचना आणि जुन्या जमान्यातील नादमधूर संगीताच्या साक्षीने दुग्धप्राशनाचा आस्वाद घेत ज्येष्ठ नागरिकांनी कोजागिरी पोर्णिमा उत्साहात साजरी केली. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने शुक्रवार दि. ३० रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कुणाल आयकॉन रोडवरील स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर झालेल्या या आनंदमयी सांस्कृतिक सोहळ्याचे सामाजिक कार्यकर्ते आणि चॅलेंजर पब्लिक स्कूलचे संचालक संदीप काटे यांच्याहस्ते दिपप्रज्वलन करुन उद्घाटन करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रभागातील नगरसेवक विठ्ठल नाना काटे यांनी या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांसोबत '' जो तुमको हो पसंद वही बात करेंगे '' हे गाणे सादर करीत ज्येष्ठ नागरिकांचा आनंद द्विगुणित केला. डॉ. सुभाषचंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात पी के इंटरनॅशनल



स्कूलचे संचालक जगन्नाथअप्पा काटे, आनंद हास्य योगा क्लबचे अध्यक्ष दिगंबर राजगुरे, लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष अशोक वारकर तसेच ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे पदाधिकारी सखाराम ढाकणे, सुभाष पाटील , शकुंतला शिंदे, अनिल कुलकर्णी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी भामिनी महाले यांनी कोजागिरीच्या औचित्याने कविता सादर केली. त्यानंतर रवींद्र संधानशिवे, अशोक येळंमकर, रेखा येळंमकर,अनिल कुलकर्णी, माधुरी मुलमुले, सुभाष विधाते, शशांक लोकरस, जयपाल सिदनाळे, रमेश चांडगे, अविनाश ईजारदार, सुरेखा पाटील आदिंनी गाण्यांच्या माध्यमातून उपस्थितांचे मनोरंजन केले. . उमेश धूत यांनी '' नटसम्राट '' या नाटकातील एक प्रसंग सादर केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शकुंतला शिंदे यांनी केले. आभार सखाराम ढाकणे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अनीलकुमार शाह, रमेश वाणी, दिलिप चौगुले, अशोक कलाल, निर्मला कासार, शोभा राजगुरे, पद्मा गवळी, विमल मोंढेकर आदींनी परिश्रम घेतले.












महानुभाव पंथ : एक प्रगतशील विचारधारा.!

ज्योतिर्मय साहित्य

महानुभाव पंथ, एक प्रगतशील विचारधारा, असे शीर्षक आणि श्री चक्रधर स्वामींचे सुंदर भावस्पर्शी मुखपृष्ठ असलेला आध्यात्मिक ग्रंथ वाचण करण्याचे भाग्य लाभले. ख्यातनाम प्रतिभावंत लेखिका सौ. योगिता प्रकाश निपाणे यांचे प्रतिभाशाली लेखनीतून साकार झालेले महानुभाव पंथा विषयी माहिती असलेले लेखन तात्कालीन सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीचे अभ्यासपूर्ण विवेचन असल्याचे दिसून येते. मुद्देसूद विश्लेषणात्मक वैचारिक लेखनामधून लेखिकेने दिलेल्या पंथाविषयी माहिती सोबत इतरही बाबींचा साक्षात्कार वाचकांना होतो. ग्रंथामधील सादर केलेली अनुक्रमणिका चौदा प्रकारचे विविध माध्यमातून साकार झालेली आहे आणि त्यानुसार पुढे विविध मुद्यांचा लेखिकेने वैचारिक विस्तार केलेला आहे, असे दिसून येते. लेखिका सौ. योगिता निपाणे यांनी विविध वृत्तपत्रांमध्ये विविधांगी विषयावर लेखन केलेले आहे. मासिके,त्रैमासिके, प्रातिनिधिक काव्य संग्रहामध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कविता आशययूक्त आणि दर्जेदार आहेत.

महानुभाव पंथातील वाड्मय हे मराठी भाषेतील पहिले लिखित साहित्य आहे. श्री चक्रधर स्वामींनी त्यांचा संदेश व उपदेश जनसामान्यांना मराठी भाषेत दिला. नंतरच्या काळात त्यांच्या शिष्यगणांनी म्हणजेच म्हाईंभट, नागदेवाचार्य तसेच इतरही अनुयानांनी मराठी भाषेत साहित्याची निर्मिती केली. त्यामुळे महानुभाव साहित्य हे मराठी भाषेतील एक अनमोल ठेवा आहे. श्री चक्रधर स्वामी यांचा समाजसुधारणा आणि समतावादी दृष्टिकोन लेखिकेने अनेक ऐतिहासिक संदर्भ आणि ग्रंथांचा आधार देऊन अभ्यासपूर्ण पध्दतीने सहज, सुंदर व सोप्या भाषेत समोर मांडलेला आहे. सोबतच प्राकृत भाषेचे तत्कालीन महत्व सुध्दा विषद केलेले आहे. श्री चक्रधर स्वामींचे प्रगतशील विचारांचा उलगडा करण्याकरिता स्वामींच्या लिळांचे विश्लेषणात्मक वैचारिक विवेचन त्यांनी अगदी सहजपणे वाचकांचे नजरेस आणलेले आहे. तसेच आधुनिक काळात महानुभाव पंथाचे महत्व आणि संशोधन याची मुद्देसूद कारणमिमांसा सादर केलेली आहे. महानुभाव हस्तलिखिते आजही ताडपत्रावर नी कागदावर आहे, ती आधुनिक पध्दतीने जतन करण्यासाठी आवश्यक कामकाज चालू असल्याचे नमूद केलेले आहे. एकंदरीत कित्येक शतकापूर्वीचा हा मराठी साहित्यामधील प्रबोधनपर असलेला अनमोल ठेवा चिरकालीन टिकून राहण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान महत्वपूर्ण असणार आहे. महानुभाव तत्वज्ञान हे केवळ भारतापुरते मर्यादित नसून जागतिक पातळीवर पोहचले आहे. मराठी भाषा आणि संस्कृतीचा अभ्यास करतांना



महानुभाव साहित्य फार मोठे महत्वाचे माध्यम म्हणून गणल्या जात आहे.

श्री चक्रधर स्वामींनी त्यांची शिकवण विविध दृष्टांतांचे माध्यमातून सर्वसामान्य जनतेला समजावून सांगितलेले आहे. दृष्टांतपाठ या ग्रंथातील तिन सुत्राचे आधारित लेखिकेने अनेक दृष्टांतांची विश्लेषणात्मक माहीती प्रभावशाली रितीने विषद केलेली आहे. वाचकांना ती आकृष्ट केल्याशिवाय राहात नाही. तसेच महानुभाव पंथाचा विज्ञान विषयक दृष्टिकोन तर्कशुध्दता, निसर्ग नियम व अंधश्रध्दा निर्मुलन या तिन मुद्द्यांवर सविस्तर स्पष्ट करुन सांगितलेला आहे. श्री चक्रधर स्वामी यांचे मध्ययुगीन विचार आजच्या वैज्ञानिक युगात देखील निश्चितच मार्गदर्शक तत्व आणि सूत्र आणि तेवढेच समर्पक ठरतात, लेखिकेच्या स्पष्टीकरणातून ते उजागर होतात.

महानुभाव पंथीय वाङ्मयाचे माध्यमातून मराठी भाषा समृध्द होऊन तिचा प्रसार आणि प्रचाराला गती मिळालेली आहे. म्हाईंभट यांनी लिहिलेला '' लीळाचरित्र ''हा ग्रंथ मराठी भाषेचे पहिले लिखित स्वरुप आहे. श्री चक्रधर स्वामी यांचे आचार, विचार आणि शिकवण ही कायम टिकून राहावी म्हणून म्हाईंभटांनी या ग्रंथाची निर्मिती केली. या व्यतिरिक्त अनेक लिखित स्वरुपातील गदय आणि पद्य संग्रह महानुभाव साहित्यामध्ये आहे. महदंबा नावाच्या स्त्री अनुयानाने रचलेला'' धवळे'' नावाचा काव्यसंग्रह मराठी भाषेतील पहिली लिखित पद्य रचना आहे. विवाह प्रसंगी गायली जाणारी अनेक गीते या संग्रहात आहे. लेखिकेने अशा अनेक ग्रथांची माहीती अभ्यासपूर्ण पध्दतीने वाचकांसमोर आणलेली आहे. प्रत्यक्ष जीवनात संक्रमित होणारे शब्द ग्रंथांचे माध्यमातून भाषेत आल्यामुळे भाषेचा शब्द सागर समृध्द झालेला आहे. तसेच मराठी भाषेला गेयता आणि गोडवा प्राप्त करुन देण्यासाठी अशा ग्रंथाचे महत्वाचे फार मोठे योगदान आहे.

श्री चक्रधर स्वामी यांनी त्यांचे उपदेशपर कार्यासाठी अनेक ठिकाणी भ्रमंती केली. त्यांचे पदस्पर्शाने पुनीत झालेली ठिकाणं याची विस्तृत माहीती सुध्दा लेखिकेने मनोभावे सादर केलेली आहे. रिध्दपूर, पैठण, देवगिरी परिसर, जाळीचा देव अशी व अनेक ठिकाणांची वैशिष्टपूर्ण आध्यात्मिक माहीती सविस्तर दिली असल्याने मन प्रसन्नीत झाल्याशिवाय राहात नाही आणि लेखिकेच्या विषयी असलेला आदर वृध्दिंगत होत भक्तिभाव जागृत होतो. महानुभाव पंथातील ज्ञानमिमांसा, आचारधर्म आणि जीवनमूल्ये, तत्वज्ञान, उपासना या व इतरही प्रकरणात त्यांनी त्यांचे आशययूक्त संदर्भित विचार निरनिराळे संदर्भ देऊन सादर केलेले आहे. महानुभाव पंथातील पंचकृष्ण अवतार कालखंडासहित



विस्तृतपणे सांगीतलेले आहे. त्यामुळे सर्वसामान्य वाचकांना अशा अनेक प्रकरणामधून महानुभाव पंथाविषयी सखोल माहिती प्राप्त होते. एकंदरीत महानुभाव पंथ हा आध्यात्मिक नी वैचारिक ग्रंथाचे अभ्यासपूर्ण पध्दतीने लेखन केल्यामुळे तत्कालीन सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक व भौगोलिक विषयावरील सविस्तर माहिती देण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरलेला आहे.

लेखिका सौ.योगिता प्रकाश निपाणे या उच्च विद्याविभूषित असून त्यांनी समाजशास्त्र या विषयात एम.ए.केलेले आहे, सोबतच अध्यापन क्षेत्रातील डी.एड. अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे आणि व्यवसायाने त्या शिक्षिका आहे. समाजशास्त्रातील त्यांच्या अभ्यासाचे प्रतिबिंब त्यांचे लेखनात आढळून येते, तसेच विषयांचे मूल्यमापन वैचारिक पातळीवर करण्याचे कसब त्यांचे प्रतिभाशाली लेखनीमध्ये दिसून येते. सहज सुंदर मनोवेधक व सुस्पष्टता असलेली त्याची लेखन शैली वाचकांना आकर्षित करण्यासाठी सक्षम भासते. एकंदरीत त्यांनी साकारलेला महानुभाव पंथ हा ग्रंथ ऐतिहासिक, आध्यात्मिक वैचारिक क्षेत्रातील व इतरही क्षेत्रातील वाचक नी विद्यार्थी वर्गासाठी वाचनीय ठरेल, असे म्हणता येईल. दंडवत प्रणाम.

ग्रंथा विषयी सविस्तर माहिती

नाव..महानुभाव पंथ, एक प्रगतशील विचारधारा

लेखिका..सौ. योगिता प्रकाश निपाणे

संपर्क. ९८५०५ ३७१४२

प्रकाशक..अक्षरशिल्प प्रकाशन अमरावती.. ७४९९०५८८७९

मूल्य..रु २५०/-

मनाचा दिलदार माणूस...

ज्योतिर्मय साहित्य

काही नाती रक्ताची असतात, तर काही नाती मनाची असतात. रक्ताच्या नात्यांना जन्माचा आधार असतो, पण मनाच्या नात्यांना प्रेम, जिव्हाळा आणि विश्वासाचा. माझ्या आयुष्यात अशीच एक व्यक्ती होती, ज्यांनी सासरे आणि सून या नात्याच्या चौकटी ओलांडून मला मुलीप्रमाणे प्रेम दिले. ते म्हणजे माझे सासरे, स्वर्गवासी विलासराव बापूसाहेब मोहरीर. (अण्णा).....

ते सर्वांचेच मोठे भाऊ.... अण्णा होते.

आजही जीवनाच्या एखाद्या शांत संध्याकाळी, जुन्या आठवणींची पाने अलगद उलगडली जातात आणि त्यांचा प्रेमळ चेहरा डोळ्यांसमोर उभा राहतो. त्यांची आठवण आली की मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी किशोर कुमार यांचे ''जिंदगी के सफर मे गुजर जाते है...'' हे गाणे गुणगुणू लागते. लग्न होऊन मी सासरी आले, तेव्हा नव्या घरात, नव्या नात्यांमध्ये स्वतःला शोधत होते. त्या काळात त्यांनी मला कधीच परके वाटू दिले नाही. त्यांनी मला सून म्हणून नव्हे तर मुलगी म्हणून स्वीकारले. त्यांच्या नजरेत काळजी होती, शब्दांत माया होती आणि कृतीत आपलेपणा होता.

लग्नापूर्वी माझे बी.ए. पूर्ण झाले होते,



तरी ते नेहमी म्हणायचे, ''तू आणखी शिक. शिक्षण कधीच वाया जात नाही. नोकरी मिळो अथवा न मिळो, ज्ञान नेहमी तुझ्यासोबत राहते.'' माझा मुलगा लहान असताना मी अभ्यासाला बसले की त्याला सांभाळण्याची जबाबदारी ते आनंदाने घेत असत. माझे शिक्षण, माझी स्वप्ने आणि माझी प्रगती यांची त्यांना मनापासून काळजी होती.

त्यांच्या या एका वाक्याने माझ्या आयुष्याची दिशा बदलली. त्यांनी माझ्या आत्मविश्वासाला बळ दिले. माझ्यातील क्षमता माझ्यापेक्षाही जास्त त्यांनी ओळखली. आज मी माझ्या पायावर उभी आहे, त्यामागे त्यांच्या प्रोत्साहनाचा आणि आशीर्वादाचा मोठा वाटा आहे.

ते बँकेत उच्च पदावर कार्यरत होते. पद मोठे होते, जबाबदाऱ्या मोठ्या होत्या; पण मन मात्र विलक्षण साधे होते. त्यांच्या वागण्यात कधीही पदाचा गर्व नव्हता. माणसांशी माणुसकीने वागणे, प्रत्येकाचा आदर राखणे, गरजूला मदतीचा हात देणे आणि नाती जपणे हेच त्यांचे खरे वैभव होते. त्यांनी आयुष्यभर संपत्तीपेक्षा माणसे कमावली.

आज ते या जगात नाहीत. पण खरंच ते नाहीत का? शरीराने ते दूर गेले असतील, पण त्यांच्या आठवणी, त्यांचे संस्कार आणि त्यांची शिकवण जिवंत आहे. जीवनात जेव्हा एखादा कठीण प्रसंग येतो, मन डळमळते किंवा



निर्णय घेताना संभ्रम निर्माण होतो, तेव्हा त्यांच्या शब्दांचा आधार नकळत मिळतो. जणू ते म्हणत असतात, ''रेवती, घाबरू नकोस, पुढे चालत राहा.''

माझे वडील आणि माझे सासरे हे माझ्या आयुष्यातील दोन असे आधारवड आहेत, ज्यांच्या सावलीत मी आयुष्याचा प्रवास केला. आज ते दोघेही प्रत्यक्ष माझ्यासोबत नसले तरी त्यांचे आशीर्वाद माझ्या पाठीशी आहेत, अशी माझी श्रद्धा आहे. कधी कधी वाटते, ते दोघेही माझ्या प्रत्येक यशावर हसत असतील, माझ्या प्रत्येक संकटात माझ्या पाठीवर हात ठेवून उभे असतील.

मी स्वतःला भाग्यवान समजते, कारण मला दोन वडिलांचे प्रेम लाभले. एक जन्मदाते वडील आणि दुसरे सासऱ्यांच्या रूपाने लाभलेले वडील. दोघांनीही दिलेली प्रेमाची शिदोरी, शिक्षणाची प्रेरणा, माणुसकीची शिकवण आणि जीवन जगण्याची ताकद हीच माझी खरी शक्ती आहे.

काळ पुढे सरकत राहतो, माणसे दूर जातात, पण काही व्यक्ती हृदयात कायम घर करून राहतात. माझ्यासाठी विलासराव बापूसाहेब मोहरीर हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या आठवणींचा सुगंध माझ्या आयुष्यभर सोबत राहील, आणि त्यांच्या आशीर्वादाची ऊब माझ्या प्रत्येक पावलाला दिशा देत राहील एवढे मात्र निश्चित खरे आहे.

***

स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयात इंदिरा गांधी पुण्यतिथीनिमित्त अभिवादन!

उपप्राचार्या राजश्री महाजन यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण; मान्यवर शिक्षकांची उपस्थिती

ज्योतिर्मय साहित्य

जळगाव / गोकुळसिंग राजपूत- जळगाव : स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, मु. जे. महाविद्यालय येथे भारताच्या माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या राजश्री महाजन यांनी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी पर्यवेक्षिका शिल्पा सरोदे, कला व वाणिज्य विभागाचे समन्वयक प्रा. उमेश पाटील, विज्ञान विभागाचे समन्वयक प्रा. गुणवंत वंजारी यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनश्री पाटील यांनी केले. त्यांनी आपल्या मनोगतातून इंदिरा गांधी यांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकला.



देशाच्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीत त्यांनी बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका, त्यांचे नेतृत्व, धाडसी निर्णयक्षमता आणि देशसेवेतील योगदान यांची माहिती विद्यार्थ्यांना व उपस्थितांना करून दिली.

इंदिरा गांधी यांच्या कार्याचा आणि देशासाठी दिलेल्या योगदानाचा स्मरण करून देणारा हा अभिवादन कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सांस्कृतिक कार्यक्रम समितीचे अध्यक्ष प्रा. एस. के. वानखेडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. उपस्थित शिक्षकवृंदांच्या सहभागाने कार्यक्रमाची सांगता झाली.



कुटुंबप्रमुख हवा आहे! क्रमशः भाग १९ : साडेतीन मुहूर्त

ज्योतिर्मय साहित्य

दुसऱ्या दिवशी रात्री सर्वजण एकत्र जेवायला बसले. आजोबांनी कालच्या चर्चेचा धागा पुढे सुरू केला.

''मुहूर्त हा केवळ घड्याळातील वेळ नसून एखादे कार्य सुरू करण्यासाठी निवडलेला अनुकूल कालखंड, अशी भारतीय परंपरेतील धारणा आहे. मात्र, कोणतेही कार्य योग्य संकल्पाने, प्रयत्नांनी आणि पद्धतीने करणेही तितकेच महत्त्वाचे आहे, हे आपण काल बोललो होतो.''

''हो, आजोबा! आता ते राहिलेले साडेतीन मुहूर्त कोणते, ते सांगा ना,'' श्रीराम म्हणाला.

''हिंदू दिनदर्शिका आणि ज्योतिषपरंपरेनुसार गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया आणि दसरा हे तीन पूर्ण मुहूर्त, तर दिवाळीचा पाडवा म्हणजे बलिप्रतिपदा हा अर्धा मुहूर्त मानला जातो. या दिवसांना स्वयंसिद्ध मुहूर्त असेही म्हणतात. या दिवशी शुभकार्य करण्यासाठी स्वतंत्र मुहूर्त पाहण्याची आवश्यकता नसते, अशी परंपरागत श्रद्धा आहे,'' आजोबा म्हणाले.

''आजोबा, हे दिवस शुभ आहेत, असे कशावरून मानले जाते?'' श्रीरामने विचारले.

''मला आवडले, श्रीराम! तू प्रश्न विचारलास. आधुनिक जगात पुराव्याशिवाय कोणतीही गोष्ट स्वीकारली जात नाही. विज्ञान आणि न्यायशास्त्रही प्रत्येक विधानाचा आधार तपासतात,'' आजोबा म्हणाले.

''मामा, प्राचीन भारतीय शास्त्रांतही पुराव्याला महत्त्व होते का?'' पमेलाने विचारले.

''अगदी होते! महर्षी गौतमांनी प्रवर्तित केलेल्या न्याय दर्शनात ज्ञानाचे प्रमाण आणि सत्य जाणण्याच्या पद्धतींची सविस्तर चर्चा आहे. प्रत्यक्ष, अनुमान, उपमान आणि शब्द ही त्यातील चार प्रमाणे मानली आहेत.''

''मग साडेतीन मुहूर्त शुभ मानण्यामागे काय कारण आहे?'' श्रीरामने विचारले.



''या दिवसांना धार्मिक आणि पौराणिक परंपरेत विशेष महत्त्व आहे. गुढीपाडव्याला सृष्टीच्या निर्मितीशी आणि रामाच्या अयोध्येत पुनरागमनाशी जोडले जाते. अक्षय्य तृतीयेला त्रेतायुगाचा प्रारंभ आणि परशुराम जयंती मानली जाते. दसरा हा रामाचा रावणावरील विजय आणि दुर्गेचा महिषासुरावरील विजय यांच्याशी जोडला जातो. बलिप्रतिपदेला वामनावताराची कथा सांगितली जाते. या परंपरांमुळे या दिवसांना विशेष पावित्र्य प्राप्त झाले आहे.''

''म्हणजे आपण दिवाळीच्या पाडव्याला सत्यनारायणाची पूजा करू शकतो ना?'' पमेलाने विचारले.

''अर्थात करू शकतो!'' आजोबा म्हणाले.

''ठरले तर! आपण दिवाळीच्या पाडव्याला पूजा करूया,'' पमेला आनंदाने म्हणाली.

''छान! पण आधी अयाचित गुरुजींना विचारून वेळ निश्चित करा,'' आजोबा म्हणाले.

क्रमशः भाग २० : सत्यनारायणाची पूजा आणि मनाचे श्लोक

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

सुकाणू : राजकीय वर्तमानाचे समकालीन वास्तव

ज्योतिर्मय साहित्य


प्रा सुरेश आडके हे एक सिद्धहस्त कथाकार कादंबरीकार. यांची सुकाणू ही आजच्या समकालीन राजकीय अस्वस्थ वर्तमानाची प्रखर जाणीव करून देणारी कादंबरी.उच्च विभूषित आजच्या तरुण पिढीचा मूल्याधिष्ठित, विवेकी समाजहिताचे राजकारण कसे असावे? याचे नितीपाठ देणारा सदानंदया कांदबरीचा नायक.अध्यापन व राजकीय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक चिंतन चिकित्सक अभ्यासक विवेचक सुरेश आडके सर यांची या

लोकशाही संवैधानिक प्रजासत्ताक स्वातंत्र्यातील राजकारणाकडे नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेय भावनेतून पाहण्याचा दृष्टिकोन सूकाणू या कादंबरीने दिला आहे.

प्रत्यक्षात गाव तालुका पातळीवरील राजकारणाचा हा साक्षात अंतरंग आहे.आपल्या संसदीय लोकशाहीने या सर्वहारा समाज व्यवस्थेच्या कल्याणकारी दृष्टीचा अनुबंध बांधला आहे. जनहित कल्याणकारी राजकीय दृष्टी असली पाहिजे.हा छत्रपती शिवाजी महाराज ते फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांची ही बांधिलकी ही सुकाणू कादंबरी देऊन जाते. कादंबरीचा कथासार असा,

बबनराव भोसले एक राजकारणी बापजाद्याच्या जीवावर मोठा झालेला.वडीलाचा राजकीय वारसा मिळालेला. याने आप्तस्वकीय कधीच जवळ केले नाही.म्हणून इथे भावकीची टवकी शाबूत राहत नाही. पण बबनरावचा स्वकिय सहाय्यक (पी.ए.) सदानंद हा सुकाणू म्हणजे दिशादर्शक विकासचे मार्गदर्शक करणे.एक प्रचंड चाणक्य नितीचा सकारात्मक दृष्टिकोनाचा युवक. एक निष्ठावंत पाईक म्हणून सामाजहित राजकीय नेत्याला सांभाळता आले पाहिजे.या बबनरावने गावपातळीवर द्वेषाचे राजकारण केले.सगे सायरे नातेवाईक यांच्या नजरेतून हा नेता उतरला. कारण त्यानी एक स्त्री रजनीशी संबंध होते.सदानंदच्या सल्ल्याने तिला शहरात घर बांधून दिले.तिला एक अपत्य ही झाले. त्याच दिवशी सदानंद

एपीएमसी परीक्षा पास झाला. तो उपजिल्हाधिकारी म्हणून. पण नोकरी केली नाही. बबनरावची बायको लक्ष्मी. घरकाम करणारी फक्त नेत्यांची बायको.एवढीचं किंमत. एक मुलगी मुक्ता, मुलगा अमेय शिक्षण करतं आहेत. सदानंदाने त्याच्या कौटुंबिक, राजकीय सामाजिक वर्तमानाची अस्वस्थ बेइमानी इतक्या सहजपणे घालवली ती बबनरावच्या





भावकीची टवकी सकारात्मक केली.

गावातील सर्वहारा समाज व्यवस्थेतील लोक व भावकी यांच्यासाठी जनहित राजकीय कार्य करीत राहणे.त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून त्यांचे सकारात्मक मत तयार करण्याचे काम सदानंद करीत होता. पेट्रोल पंप टाकला.

यामुळे गावलोकात बबनराव भोसले विषयी आत्मिक जिव्हाळा निर्माण केला. तुकाराम जाधवची मृत्यूची चिठ्ठी, बबनराव व रजनी यांचे राजकीय भांडवल करून विरोधक टपून होते. सदानंदने बबनरावची राजकीय वैभवशाली घडी बसवली.हे कार्यप्रणाली पाहून मुक्ता सदानंदवर प्रेम करते.पण तो नाकारतो.कारण आपण सामान्यकुटुंबातील.

सदानंदची प्रत्येक चाणक्य चाल ही फक्त बबनरावसाठी असते. मुक्ताचे लग्न एका धनाढ्य राजकीय कुटूंबात तोच जुळवतो. धरणग्रस्ताना विस्थापितांना त्यांचा मोबदला मिळाला पाहिजे, मागासवर्गीयांच्या विकासासाठी सदोदित त्यांच्या नेतृत्वात त्यांना सन्मान देणे, मराठा आरक्षण संघर्षचा विचार ही इथे येतो.विरोधक बबनरावाचे तिसरे अपत्य विषयक डाव टाकू पाहतात. पण सदानंदने तोही डाव हानून पाडला. रजनीच बायको म्हणून नाववर करुन घेतली.तिचं अपत्य श्रेयस सदानंद मोगरे. बबनरावचा अर्ज वैध. नगरपालिका विवाह नोंदणीत रजनी सदानंद मोगरे, पुढे शेषराव घोरपडे डिएन टेस्टची मागणी. धर्मराज पाटील वंचित मराठा उन्नती अभियान.या साऱ्या झपाट्यात बबनराव भोसले प्रगतीच होते. सदानंद मोगरेला गायब केल्या जाते. जनतेत असंतोष.राज्याच्या राजकारणात सदानंदाची ख्याती झाली.बबनराव भोसलेचा विजय होतो.जलसंपदा मंत्री होतो. शेषनारायण सागरचे उद्घाटन, अमेय अमेरिकेनं पोरीच्या प्रेमात. तिथेही सदानंदाचा सल्ला फॉरेनची पाटलीनलग्न होते. त्याचं दिवशी मुख्यमंत्री सुदामराव जगताप यांचे निधन. पुढे पोटनिवडणूक नरेश ची प्रतिमा मलिन म्हणून स्पर्धा परीक्षेची तयारी करणारी.किल्लेदार साहेबांनी सायली जगताप हीची निवड केली. सायली जगताप निवडून येते.

विधिमंडळात जाते सायली वक्तृत्व स्पर्धेची प्रथम विजेती.तर सदानंद हा द्वितीय विजेता. अमेयच्या लग्नात तिला खूप दिवसांनी पाहिले.हे प्रेमानुबंध इथे आहेत.

विधिमंडळाचे श्रेय बबनराव भोसले व सदानंद यांना देते. पुढे श्रीकृष्ण-सुदामा पॉवरहाऊस! महाराष्ट्र शासन राज्यपाल हे उद्घाटन पाहून मुख्यमंत्री किल्लेदार गहिवरून येतात. ''इतिहास सांगतो यशवंतराव चव्हाण उपपंतप्रधान झाले;पण महाराष्ट्राच्या मातीला आजवर पंतप्रधानपद मिळू शकले नाही. गेले अनेक वर्षे आम्ही केंद्रात झटतोय; पण दिल्ली काबीज करता आली नाही ''(पृ.१२६) सदानंद हा नियुक्त आमदार विधानपरिषदेत मंत्री.असा हा कांदबरी सारं.

इथे सुरेश आडके सरांनी अनेक वर्षे सामाजिक राजकीय व्यवस्थेचा अनुभव साक्षात घेतल्याने या प्रंचड गदारोळाच्या राजकारणात माणसं वाचणारा, त्याच्या पुढच्या चालीचा अभ्यासक हा चाणक्य सुकाणू असतो.

(क्रमशः)

✍पुस्तक परिचय
डॉ प्रभाकर शेळके, जालना



नशामुक्त युवा विकसित भारतचा संदेश देत जळगावात मिनी मॅरेथॉन उत्साहात!

एकलव्य क्रीडा संकुलाच्या पुढाकाराने शेकडो धावपटूंचा सहभाग; शालेय व खुल्या गटातील विजेत्यांचा सन्मान

ज्योतिर्मय साहित्य

जळगाव /गोकुळसिंग राजपूत

-युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार करणे आणि क्रीडाप्रेम वाढविण्याच्या उद्देशाने नशामुक्त भारत अभियानांतर्गत आयोजित मिनी मॅरेथॉन २०२६ स्पर्धा जळगाव येथे उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेत शेकडो धावपटूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मिनिस्ट्री ऑफ युथ अफेअर्स अँड स्पोर्ट्स, भारत सरकार, भारतीय क्रीडा प्राधिकरण, फिट इंडिया चळवळ आणि खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित एकलव्य क्रीडा संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नशामुक्त युवा विकसित भारत हा संदेश यावेळी देण्यात आला.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी के.सी.ई. सोसायटीचे सहसचिव ॲड. प्रवीणचंद्र जंगले अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे असिस्टंट डायरेक्टर माधव कांबळे, स्वामी समर्थ शैक्षणिक संस्थेचे संस्थापक मनोज पाटील, चे जिल्हा युवा अधिकारी अभिषेक चौरे, रामानंद नगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सचिन रनशेवरे आदी उपस्थित होते. यावेळी भालचंद्र पाटील, प्रा. राजश्री महाजन, सुषमा कंची यांचीही उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या प्रारंभी नशामुक्त भारत अभियानाची सामूहिक शपथ घेण्यात आली. त्यानंतर वार्मअप, झुम्बा व एरोबिक्सचे आयोजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून मॅरेथॉनला सुरुवात झाली.

स्पर्धेत १३ ते १६ वर्षे वयोगटासाठी ५ किलोमीटर, तर १७ वर्षांवरील खुल्या गटासाठी १० किलोमीटर अंतर ठेवण्यात आले होते. एम.जे. कॉलेजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत विविध चौकांमधून धावपटूंनी मार्गक्रमण केले. स्पर्धेनंतर व्यसनमुक्तीचा संदेश देणारे पथनाट्य सादर करण्यात आले. यामधून व्यसनांचे दुष्परिणाम आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व प्रभावीपणे पटवून देण्यात आले.

विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

शालेय गटातील मुलांमध्ये कार्तिक दीपक हटकर याने प्रथम, कुणाल महाले याने द्वितीय, तर नैतिक चव्हाण याने तृतीय क्रमांक पटकाविला. मुलींमध्ये सेजल मोरे प्रथम, तेजस्विनी ढाके द्वितीय, तर गायत्री पाटील तृतीय आली.

खुल्या पुरुष गटात अजय तडवी याने प्रथम, योगेश पाटील याने द्वितीय, तर अजय वसावे याने तृतीय क्रमांक मिळविला. महिला गटात गायत्री सोनवणे प्रथम, गायत्री बोरसे द्वितीय, तर रोहिणी बिऱ्हाडे हिने तृतीय क्रमांक पटकाविला. प्रत्येक गटातील प्रथम ते सहाव्या क्रमांकाच्या विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

स्पर्धेच्या यशस्वितेसाठी एकलव्य क्रीडा संकुलातील डॉ. रणजीत पाटील, चंद्रलेखा जगताप, निलेश खडके, वसंत सोनवणे, योगेश चव्हाण, अंकुश तेली, पंकज बाविस्कर, अमोल गोमटे, योगेश महाजन, पंकज महाजन, सागर सोनवणे तसेच कर्मचारीवर्गाने परिश्रम घेतले.

संपूर्ण कार्यक्रम प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण बेलोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या मॅरेथॉनच्या माध्यमातून युवकांनी व्यसनांपासून दूर राहून नियमित व्यायाम व खेळांना प्राधान्य द्यावे, असा आरोग्यदायी जीवनाचा संदेश देण्यात आला.

लोककलेचा जाणता सेवक - विठ्ठल उमप

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्र राज्यातील लोकशाहीर विठ्ठल उमप यांचा जन्म १८ जूलै १९३१ मध्ये मुंबई मधील नायगाव येथे गरीब कामगारांच्या कुंटूबात झाला. ते मूळचे अहिल्या नगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील चिखली गावचे रहिवासी होते.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचे निष्ठावंत सामाजिक कार्यकर्ते ही होते.त्यांनी जवळपास दहा मराठी चित्रपटांमध्ये अतिशय उत्कृष्ट अभिनय सादर केला आहे. काही हिंदी चित्रपटांमध्ये ही अभिनय केले.

त्यांच्या नावावर आज १००० लोकगीते गायलेले रेकॉर्ड आहेत.

त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे पोवाडे वीर रसात गायले.

बहुरूपीयाचे सोंग आणले.भजनी मंडाळात संत एकनाथ महाराजाचे भारूडे आणि भजन तालासुरात म्हटले. गणगवळण गाऊन लोककला जिवंत ठेवल्या.

लावणी ही महाराष्ट्राची शान आहे.ती त्यांनी साता समुद्रापार नेली.तुंबडी,बोबडी हे लोक कला प्रकार त्यांनी जनमानसात म्हणून लोकधारा चालू ठेवली.महाराष्ट्रात लोककलेच्या रूपाने पोतराज हातात चाबुक घेऊन आपल्या अंगावर फटके स्वतः घेऊन देवीच्या नावाने जयजयकार करुन आपला उदरनिर्वाह करताना दिसतात. नंदी बैल घेऊन काही भटक्या जमाती गावोगावी फिरून चांगला पाऊस पडू दे.म्हणून मान हलवताना नंदीबैल दिसतात.वासुदेव ही सकाळच्या प्रहारी अंगणात टाळ वाजवत येतो. आणि देवाची गाणी म्हणतो.डोंबारी दोरी वरील कसरती दाखवून मनोरंजन करतात.तसेच गझल गायन ही त्यांनी केले. वरील सर्व प्रकार त्यांनी लोककलेच्या माध्यमातून केलेअसा हा अष्टपैलू कलाकार पुन्हा होणे नाही.फु बाई फु हे त्यांचे आत्मचरित्र खूप प्रेरणादायीआहे.अबक,दुबक, तिबक,खंडोबाच लगीन,जांभूळ आख्यानाचे ५०० प्रयोग झाले,अरे संसार संसार,दार उघड बया,दार उघड,धनगरी गीते, भीम गीते,कोळीगीते या कलाकृती अजरामर झालेल्या आहेत.उमाळा हा गझलसंग्रह फारच प्रसिध्द आहे.फाटकी नोट मला घ्यावयाची नाय हे लोकगीत लोकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले.

आयर्लंड येथे १९८३ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय लोकनृत्य स्पर्धेत लोकशाहीर विठ्ठल उमप यांनी भारताचे प्रतिनिधित्व करून देशाला प्रथम क्रमाकांचे पारितोषीक मिळवून दिले. **(क्रमशः)**

✍
प्रा.बरसमवाड विठ्ठल लक्ष्मीबाई गणपतराव या.मुखेड जि.नांदेड मो.
99212 08563

उदार आचार-विचार जपणारं व्यक्तिमत्त्व - श्री. गोविंदराव आवचार गुरुजी


ज्योतिर्मय साहित्य

मानवी जीवन हे केवळ स्वतःपुरते मर्यादित नसते. माणूस समाजात राहतो, इतरांशी नाती जोडतो, इतरांचे सुख-दुःख वाटून घेतो आणि आपल्या आचार-विचारांतून समाजावर ठसा उमटवतो. व्यक्तीचे खरे मोठेपण त्याच्या संपत्तीत, पदात किंवा प्रसिद्धीत नसते; ते त्याच्या मनाच्या विशालतेत असते. मन उदार असेल तर विचार व्यापक होतात आणि विचार व्यापक झाले की वर्तनात माणुसकी प्रकट होते. म्हणूनच 'उदार आचार-विचार' ही केवळ संकल्पना नसून जीवन जगण्याची एक समृद्ध मूल्यव्यवस्था आहे.

उदार मन म्हणजे केवळ दुसऱ्याला मदत करणारे मन नव्हे. दुसऱ्याच्या मतांचा आदर करणे, त्याच्या परिस्थितीला समजून घेणे, चुकांसाठी सुधारण्याची संधी देणे, दुःखात साथ देणे, दुसऱ्याच्या यशात मनापासून आनंद मानणे, क्षमा करणे आणि स्वतःच्या पलीकडे जाऊन समाजाचा विचार करणेही उदार मनाची खरी लक्षणे आहेत. 'मी' पेक्षा 'आपण' या भावनेला महत्त्व देणारा माणूसच खऱ्या अर्थाने उदार असतो.

या मूल्यांचा विचार करताना श्री गोविंदराव आवचार गुरुजी यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांच्या नावाशी जोडलेली आपुलकी, माणुसकी, सामाजिक जाणिवा आणि इतरांविषयीचा जिव्हाळा ही उदार मनाच्या आचार-विचारांची प्रेरणादायी उदाहरणे मानता येतील. व्यक्तीचे नाव मोठे होते ते केवळ तिच्या कर्तृत्वामुळे नव्हे, तर तिच्या वागण्यातून इतरांच्या मनात निर्माण झालेल्या आदरामुळे. म्हणूनच श्री गोविंदराव आवचार गुरुजी यांचा उल्लेख हा उदारता, नम्रता आणि माणुसकीच्या मूल्यांशी जोडलेला माणूस म्हणून केला जातो.

आजच्या स्पर्धात्मक युगात प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या प्रगतीसाठी धडपडत आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय, संपत्ती आणि प्रतिष्ठेच्या स्पर्धेत कधी कधी माणुसकी मागे पडते. दुसऱ्याचे यश पाहून मत्सर निर्माण होतो, मतभेद मनभेदात बदलतात आणि स्वतःचे मतच अंतिम सत्य असल्याचा गैरसमज निर्माण होतो. अशा परिस्थितीत उदार मनाचे आचार-विचार जपणे ही काळाची



गरज असते. ही वत्ती गुरुजींनी आपल्या जीवनात सातत्याने जोपासली आहे. केवळ जोपासली नाही तर प्रत्यक्षात कृतीतदेखील उतरवली आहे.

उदार मनाची पहिली खूण म्हणजे समजून घेण्याची वृत्ती. ती गुरुजींनी आपल्या कौटुंबिक व सामाजिक जीवनात बाळगली आहे. एखाद्या व्यक्तीने चूक केली तर ते लगेच तिच्यावर टीका करण्याऐवजी 'ही चूक का झाली असेल?' असा विचार करत. प्रत्येक व्यक्तीच्या वागण्यामागे तिचे अनुभव, परिस्थिती आणि संघर्ष कारण असतात, या गोष्टीची जाणीव गुरुजींना होती. इतरांच्या वेदना समजून घेण्याची संवेदनशीलता ही उदार मनाची पायाभरणी असते. त्यामुळे ही संवेदनशीलता तसेच मतभिन्नतेचा आदर ह्या गोष्टी गुरुजींच्या इतरांशी व्यवहारातून प्रतित झाल्या आहेत. सामाजिक जीवनात वावरताना गुरुजींनी एक गोष्ट स्पष्ट केली होती की, प्रत्येक व्यक्तीचे अनुभव आणि विचार वेगळे असतात. त्यामुळे सर्वांनी आपल्यासारखेच विचार करावेत, अशी अपेक्षा ठेवणे योग्य नाही. 'माझे मत योग्य आणि दुसऱ्याचे चुकीचे' या हट्टापेक्षा 'तुझे मत वेगळे आहे; ते समजून घेऊया' हा अधिक सुसंस्कृत दृष्टिकोन गुरुजींनी बाळगला आहे. त्यांच्या मते विचारांना विरोध करता येतो; परंतु व्यक्तीचा अपमान न करता. ही उदार विचारांची खरी कसोटी गुरुजींच्या जीवनात पाहायला मिळाली आहे.

गुरुजींच्या उदार मनाची आणखी एक महत्त्वाची खूण म्हणजे क्षमा करण्याची ताकद. राग, द्वेष आणि सूडाची भावना मनात साठवून ठेवल्यास सर्वांत आधी स्वतःचेच मन अस्वस्थ होते. त्यामुळे क्षमा करणे म्हणजे चुकीच्या गोष्टीचे समर्थन नव्हे; तर त्या चुकीमुळे आपल्या मनावर निर्माण झालेला भार कमी करणे होय हा पाठ गुरुजीनी इतरांना घालून दिला. जगताना अन्यायाविरुद्ध ठाम राहतानाही मनात कायमचा द्वेष न ठेवता जीवन जगले पाहिजे ह्या त्यांच्या उदार मनाच्या शिकवणीचा आणि उदार मनाच्या सुंदर गुणाचे दर्शन गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वातून घडते. दुसऱ्याच्या यशात आनंद मानणे. एखादा मित्र, सहकारी किंवा परिचित व्यक्ती यशस्वी झाली तर तिचे मनापासून कौतुक करणे, दुसऱ्याच्या यशामुळे आपले यश कमी होत नाही. उलट दुसऱ्याला प्रोत्साहन देणारा माणूस स्वतःही मोठा होत जातो. मत्सर मनाला संकुचित करतो, तर कौतुक मनाला विशाल बनवते. उदारतेचा विचार गुरुजींनी आपल्या वागण्यातून दाखविलेला आहे. समाजातील गरजू व्यक्तीला मदत करणे, विद्यार्थ्याला मार्गदर्शन करणे, निराश व्यक्तीचे मनोबल वाढवणे, अडचणीत असलेल्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे किंवा चांगल्या कार्याला प्रोत्साहन देणे ही माणुसकीची रूपे गुरुजी आजही व्यवहारात पाळताना दिसतात. माणसाने समाजात अडल्यानाडल्यांना शुध्द हेतूने त्याची गरज भागवतांना 'मी उपकार करीत आहे' असा भाव न ठेवता मदत ही माणुसकीची सहज अभिव्यक्ती आहे ही गोष्ट ध्यानात ठेवून काम केले पाहिजे.

(क्रमशः)

शब्दांकन
प्रा.पुरुषोत्तम प्र.सूर्य
वाशीम
मो.९९२२०११९४०

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

हॉटेल सारखी पंजाबी भाजीची यलो ग्रेव्ही

ज्योतिर्मय साहित्य

हॉटेल आणि रेस्टॉरंट्समध्ये वेगवेगळ्या डिशेस बनवण्यासाठी प्रामुख्याने तीन प्रकारच्या बेस ग्रेव्ही वापरल्या जातात. त्या म्हणजे लाल, पिवळी आणि ब्राऊन रंगाची ग्रेव्ही! या ग्रेव्हीमधील मुख्य फरक त्यांच्या वापरल्या जाणाऱ्या साहित्यात आणि चवीत असतो. लाल ग्रेव्ही ग्रेव्हीला मखनी ग्रेव्ही असेही म्हणतात. ही दिसायला लाल किंवा नारंगी रंगाची असते. याची चव किंचित गोड आणि टोमॅटोमुळे असलेली हलकी आंबट असते. पनीर बटर मसाला, दाल मखनी आणि लाल रंगाच्या रिच ग्रेव्हीमध्ये याचा वापर केला जातो. पिवळ्या ग्रेव्हीला शाही ग्रेव्ही असेही मानले जाते. ही दिसायला पिवळसर असते. याची चव अतिशय सौम्य, सुगंधी आणि क्रीमीअसते हिचा वापर कोरमा, मलाई कोफ्ता, आणि ज्या डिशेस जास्त तिखट नसतात अशा भाज्यात केला जातो. तर ब्राऊन ग्रेव्हीची चव मसालेदार, कांद्याची नैसर्गिक गोडी असलेली असते. ही ग्रेव्ही दाट असते. हिचा वापर रगडा पॅटीस, व्हेज कोल्हापुरी, नॉनव्हेज भाज्यात जास्त आणि मसालेदार भाज्या मध्ये करतात. आज आपण यातील पिवळ्या रंगाची म्हणजेच यलो ग्रेव्ही बनवू.

साहित्य:

कांदे ३ ते ४ उभे चिरलेले,



१० ते १५ भिजवलेले काजू , मध्यम आकाराचे २ टोमॅटो, १ चमचा मगज बी, १ चमचा आले-लसूण पेस्ट, अर्धा चमचा हिरवी मिरची पेस्ट, घट्ट, फेटलेले दही २-३ चमचे, खडे मसाले - २ वेलची, १ तुकडा दालचिनी, ३-४ लवंगा आणि १ तमालपत्र अर्धा चमचा हळद, १ चमचा धनेपूड, चवीनुसार मीठ २ चमचे तेल, १ चमचा बटर आणि २ चिमूटभर गरम मसाला. कृती:

प्रथम एका पॅनमध्ये १ कप पाणी गरम करावे. त्यात उभे कापलेले कांदे, टोमॅटो, काजू आणि कलिंगडाच्या बिया टाकाव्या. कांदा मऊ होईपर्यंत हे मिश्रण ५-७ मिनिटे उकळून घ्यावे आणि नंतर थंड झाल्यावर, तमालपत्र काढून बाकी सर्व मिश्रणाची मिक्सरमध्ये एकदम बारीक पेस्ट करावी.

नंतर त्याच कढईत तेल आणि बटर गरम करुन त्यात सारे खडे मसाले टाकून परतावेत. त्यानंतर यामध्ये आले-लसूण पेस्ट आणि मिरची पेस्ट टाकून त्यांचा कच्चा वास जाईपर्यंत परतावे. त्यातच बनवलेली कांदा-काजूची पेस्ट घालावी व मिनिटे परतून झाल्यावर गॅस बारीक करावा आणि त्यात फेटलेले दही व हळद, धनेपूड व मीठ घालुन मंद आचेवर तेल सुटेपर्यंत ग्रेव्ही शिजू द्यावे. शेवटी गरम मसाला घालावा. आता आपली हॉटेलसारखी यलो ग्रेव्ही तयार आहे.




वैशिष्ट्य: या मूळ यलो ग्रेव्ही बेसचा वापर करून आपण पनीर, मशरूम किंवा भाज्या टाकून वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या बनवू शकतो. ती सुद्धा हॉटेलसारखी टेस्टी आणि मखमली, दाट आणि चवदार पंजाबी ग्रेव्हीत! शाही पनीर, पनीर बटर मसाला किंवा व्हेज कोफ्ता, व्हेज लवाबदार अशा कितीतरी सौम्य चवीच्या भाज्या आता घरीच बनवू शकतो. या भाज्या विशेषतः लहान मुलांना किंवा वृद्धाना, ज्यांना मसालेदार भाज्या चालत नसतील त्यांच्यासाठी खूपच उत्तम आहेत. नक्की बनवा आणि सर्वांना खुश करा.

कवितेच्या लाटावर...





























हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559